दै. प्रजावाणी दि. 04/07/25

धर्माबाद पोलिसांच्या पथकाने पुसदमध्ये जाऊन केली कारवाई

# चोरीस गेलेले सहा ऑटो व मोटारसायकल हस्तगत

वार्ताहर • धर्माबाद

मागील अनेक दिवसांपासून धर्माबाद शहरात व तालुक्यात चोरीच्या अनेक घटना घडत आहेत. त्यामुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. शहरातून दुचाकी, तीन चाकी वाहनांची चोरी मोठ्या प्रमाणात होत होती. त्यामुळे नागरिकांत भितीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु धर्माबाद पोलिसांनी चोरीच्या तपासाची चक्रे जलद गतीने फिरवून धर्माबाद येथून चोरीला गेलेले ६ ऑटो व १ मोटारसायकल पुसद येथून हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, धर्माबाद शहरात व परिसरात मागील काही दिवसापासून चोरट्यांनी धुमाकुळ घातला होता. मोटारसायकल, ऑटोरिक्षा इत्यादीच्या चोरीमध्ये वाढ झाली होती. त्यामुळे पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. दि. २९ जून रोजी रात्री १.३० ते ३.०० वाजेच्या दरम्यान रत्नाळी परिसरातून काही ऑटो चोरीस गेल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

ही बाब गांभीर्याने घेत त्यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार नांदेड, अप्पर पोलीस अधिक्षक खंडेराय धरणे भोकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपते व पोलिस निरीक्षक धर्माबाद सदाशिव भडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सपोनि पगलवाड, पोउपनि माधव लोणेकर, पोहेकॉ विलास मुस्तापुरे, पोहेकॉ माकुरवार, पोकॉ माकुरवार, सचिन गडपवार, सय्यद फहीम, पोकॉ. पंडीत जोंधळे, चापोकॉ महाजन, शहाणे सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर यांच्या पथकाने पुसद येथून सहा प्रवासी ऑटो व एक मोटारसायकल हस्तगत करुन धर्माबाद पोलीस ठाण्यात आणले आहेत.



## चार आरोपींना अटक

पोकॉ पंडीत जोंधळे यांच्या तक्रारीवरुन आरोपी शेख इमरोज शेख अब्दुल रजाक, मोहम्मद साहिल मोहम्मद साब, शेख असलम नफिस (सर्व रा. वाजेगाव नांदेड) व माजीद बेग उजेर बेग रा. आखीरतनगर पुसद जि. यवतमाळ या चार आरोपींना अटक करुन त्यांच्यावर धर्माबाद पोलीस ठाण्यात १८५/२०२५ कलम ३१० (४), ३१० (५) भा.न्या.सं. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.